४. **बालसंगोपन योजना-** अनाथ निराधार, निराश्रीत,दुर्धर आजाराने ग्रस्तांची मुले ,आत्महत्या केलेल्या शेतक-यांची मुले,दिर्घ शिक्षा भेगत असलेल्यांची मुले ई. मुलांना पर्यायी कुटुंबाच्या माध्यमातुन मुलभुत गरजांच्या पुर्ती बरोबरच कौंटुबींक प्रेम जिव्हाळा व संस्कार देण्यात येतात, कुंटुबात राहुन त्यास शिक्षण प्रशिक्षण देवुन त्यांचे पुर्नवसन करण्यात या योजनेचा लाभ देण्यात येतो. मान्यता प्राप्त स्वंयसेवी संस्था तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे कार्यालयामार्फत हि योजना राबविण्यात येत आहे. प्रती लाभार्थी ११०० प्रती माह अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात संस्थमार्फत जमा करण्यात येत असुन, त्याचा उपयोग योग्य पध्दतीने होतो अथवा नाही याची देखरेख स्वंयसेवी संस्थेमार्फत करण्यात येते, याकरीता रुपये १२५/- प्रती लाभार्थी प्रती माह संस्थेला देण्यात येत आहे. विशेषत: या कार्यालयातील लाभार्थी हे आत्महत्या केलेल्या शेतकरी शेत मजुरांची मुले, एड्सग्रस्त पालकांच्या मुलांना व तुरुंगात असलेल्या पालकांच्या मुलांना लाभ देण्यात येतो. जिल्हयात सदर योजना ७ स्वंयसेवी संस्था मार्फत राबविण्यात येत आहे.

अधिक माहितीकरीता कार्यालयाचा संर्पक क्रमांक ०७१२-२५६९९९१